दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८२ वा गुरूवार दि.२९ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## आज विविध मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा



माजी मुख्यमंत्री, विकासरत्न, लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी लातूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील११ व्यक्तींना मानाचा राजकीय,प्रशासकीय ,सामाजीक, पत्रकारीता ,सांप्रदाईक ,अभियता,महसुल ,उद्योजक, कलाक्षेत्र ,शैक्षणीक,वैधकीय, यांना शिवरत्न पुरस्कार दिला जातो.

## बिटरगाव, पळशी येथे महिला बचतगट मेळावा श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला संवाद आमदार धिरज देशमुख यांनी मतदारांचा विश्वास सार्थ ठरवला

लातूर / प्रतिनिधी :- विलासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने आपले ग्रामीणचे लोकप्रिय आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत रेणापूर ग्रामीणच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे, या निधीतून रस्ते, वीज, पाणी, आरोग्य सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण करता आल्या आहेत. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने गेल्या पाच वर्षाखाली लातूर ग्रामीणचे लोकप्रिय आमदार धीरज देशमुख यांना सर्वाधिक मतांनी निवडूण दिले, तुम्ही टाकेला विश्वास आमदार धिरज देशमुख यांनी सार्थ ठरवत लातूर ग्रामीणचा सर्वांगीण विकास केला. आगामी काळातही आपण आमदार धिरज देशमुख यांना आशिर्वाद द्याल, अशी अपेक्षा आहे, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी व्यक्त केले.

रेणापूर तालुक्यातील बिटरगाव येथे दि.२८ ऑगस्ट रोजी महिला बचत गटांचा मेळावा घेण्यात आला, त्याप्रसंगी बिटरगाव बचत गटांच्या महिलांना संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धीरज देशमुख, डॉ. सारिका देशमुख, सुनिता अरळीकर, पुजाताई इगे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, रेणाचे व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, जिल्हा बॅंकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, युवराज जाधव, धनंजय देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती.

बिटरगाव येथील महिला बचत गटाच्या मेळाव्यात पुढे बोलताना, श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या की, महिला बचत गटाच्यां महिलांना आपला छोटा-मोठा नवीन उद्योग करता यावा यासाठी जिल्हा बॅंकच्या माध्यमातून महिलांना अनुदानात वाढ करुन ती ५ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याबरोबर जिल्हा बॅंकेच्या माध्यमातून शेतकरी यांना बिन व्याजी ५ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते. आपले आमदार धीरज देशमुख यांनी गोर-बरीब शेतकजयांसाठी जिल्हा बॅंकेच्या माध्यमातून ही योजना राबवली आहे. विकासरत्न विलासराव देशमुख यांनी मराठवाड्यात साखर कारखाने उभे केले. त्याचबरोबर मांजरा नदीवर बराजेसची उभारणी करुन शेतकजयांना पाण्याची सोय करुन दिली. आपल्या साखर कारख्यान्यामार्फत जिल्ह्यातील एकही शेतकरी बांधवाचा ऊस राहत नाही. हे सर्व कारखाने आपल्या सेवेसाठी तत्पर आहेत.



शेतकजयांच्या विकासासाठी साखर कारखांची उभारणी करण्यात आल्याचे त्या म्हणाल्या. रेणापूर तालूक्यातील पळशी येथे बचत गटांचा महिला मेळावा झाला. यावेळी महिलांशी संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या की, विकसरत्न विलासराव देशमूख यांनी या भागाचा आणि या भागातील लोकांच्या विकासात योगदान दिले आहे. आज माजी मंत्री दिलीपराव देशमूख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमूख व आमदार धीरज देशमूख हेच काम पुढे घेऊन जात आहेत, असे त्या म्हणाल्या. बिटरगाव येथील महिला बचत गटाच्या मेळाव्यास मीना चव्हाण, प्रेमला पाटील, शालूबाई साके, सुदामती बोडके, पल्लवी वाकडे, हंसराज देशमुख, मधुकर चव्हाण, अमर वाकडे, शांताबाई वाकडे, कौशल्या पाटील, अक्षता देशमुख, संजना सोमासे, अजंली साखरे, प्रनिता सरवदे आदींसह गावातील नागरीक व बचतगटातील महिला मोठया संख्येने उपस्थितीत होत्या. तर पळशी येथील महिला बचत गटाच्या मेळाव्यास उध्दव जाधव, दशरत जाधव, अनिता कदम, निर्मला गायकवाड, वर्षा भंडारे, कल्पना जाधव, उषा उपाडे, अनिता कदम, रेषमा भंडारे, वर्षा जाधव, सुमन जाधव, भाग्यश्री जाधव, सुरेखा उपाडे, मंगल जाधव, उषा शिंदे, सरोजा जाधव, मिरा जाधव आदी महिला उपस्थित होत्या.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर ना. संजय बनसोडे यांनी केले स्वागत



लातूर :- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आगमन झाले. यावेळी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांचे स्वागत केले. आमदार विक्रम काळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री ना. पवार यांच्यासोबत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे यांचेही आगमन झाले.

## बुद्धगया मंदिर व्यवस्थापन समिती कायदा १९४९ रद्द करा..!

बुद्धगया हे मंदीर नसुन ते सर्व मानवांच्या दु:खमुक्तीचा व जनकल्याणाचा मद्यम मार्ग सांगणारे विश्व शांतीदुत तथागत भगवंत गौतम बुद्धांचे ते महाबोधी विहार आहे ते बौद्धांच्या ताब्यात मिळालेच पाहीजे..! आणि म्हणून दिनांक : १७ सप्टेंबर २०२४ रोजी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन व शांततापूर्ण मोर्चा (सम्राट अशोका मैदान) पटना बिहार येथे काढत आहोत. लाखोंच्या संख्येत सामील व्हा..! आकाश लामा (ऑल इंडियन बुद्धिस्ट फोरम अध्यक्ष) यांचे अव्हाण.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- बोधगया मंदिर व्यवस्थापन समिती (बीटीएमसी) कायदा १९४९ रद्द करण्यासाठी २२ राज्याचे प्रतिनिधी नागपूर येथे पारपडलेल्या बैठकीस उपस्थित होते. बीटीएमसीला मंदिराच्या बेकायदेशीर नियंत्रणातून मुक्त काण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. बीटीएमसी कायदा १९४९ रद्द करण्यासाठी ऑल इंडियन बुद्धिस्ट फोरमने दिनांक: २४ऑगस्ट २०२४ रोजी नागपूर येथे बैठकीचे आयोजन केले होते. या मध्ये १७ सप्टेंबर २०२४ ला पटना बिहार येथे पाच लाख बौद्धांच्या उपस्थित बिहार सरकार कडे बोधगया मंदिर व्यवस्थापन समिती कायदा १९४९ रद्द करण्याची मागणी करण्यात येणार आहे. देशातील बौद्धांनी बीटीएमसी १९४९कायद्याच्या विरोधात विविध घोषणांचे फलक, बॅच, पंचरंगी ध्वज घेऊन या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात सहभागी व्हावे अशी माहिती देताना ऑल इंडिया बुद्धिस्ट फोरमचे अध्यक्ष अशोक लामा म्हणाले की, बिहार सरकारने १९४९ मध्ये पारित केलेला बीटीएमसी कायदा १९४९ रद्द करण्यासाठी आम्ही आंदोलन करत आहोत. या आंदोलनात २२ राज्यातील बौद्धांचा सहभाग आहे. सुमारे ५ लाख बौद्ध अनुयायी या आंदोलनात सहभागी होणार आहेत . बीटीएमसी कायदा१९४९ अत्यंत अन्यायकारकपणे मंजूर करण्यात आला आहे, असे आमचे मत आहे. भारत सरकार आणि बिहार सरकारने तो रद्द करावा. ऑल इंडियन बुद्धिस्ट फोरमचे अध्यक्ष आकाश लामा म्हणाले की, आम्ही आमच्या मागणीसाठी पटना बिहार मध्ये शांतता रॅली काढत आहोत आणि बीटीएमसी कायदा रद्द करण्यासाठी आंदोलन करत आहोत. ते म्हणाले की भारतीय संविधानातील कलम २५ आणि २६ सांगतात की तुम्ही तुमच्या धर्माचा प्रचार प्रसार करू शकता. हजिथे तुमचे धार्मिक स्थळ आहे. तुम्ही त्याचे व्यस्थापन करू शकता. आणि आम्ही म्हणतो की बोधगया येथील बुद्ध महाविहार हा १९४९ चा कायदा रद्दबातल आहे. त्यामुळे या महाबोधी महाविहारावर असणारे सरकारी ट्रस्ट बेकायदेशीर आहे. यामध्ये जिल्हाधिकारी किंवा सरकारी पदावर असलेले लोक सरकारच्या वतीने राहतात. यामध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष आहेत, म्हणून आम्ही म्हणतो की





१९४९ च्या कायद्यात ०९ सदस्यांपैकी फक्त चार सदस्य बौद्ध असतील असे ठरविण्यात आले आहे. पण आम्ही म्हणतो की, मुस्लिम धार्मिक स्थळ असो किंवा हिंदू धार्मिक स्थळ, त्यात त्यांचा पूर्ण अधिकार असतो. त्या व्यवस्थापन समितीत असणारे लोक एकाच धर्माचे सदस्य आहेत. कारण तो त्यांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. त्याचप्रमाणे बोधगया हे आम्हा बौद्धांचे श्रद्धेचे केंद्र आहे. त्यामुळे बौद्ध स्थानाच्या समितीमध्ये सर्व बौद्ध सदस्यांचा समावेश करण्यात यावा. नव्याने बदललेल्या समितीमध्ये ०७ सदस्य इतर धर्माचे असून०२ (दोन) जागा रिक्त ठेवण्यात आल्या आहेत. तर या व्यवस्थापन समितीत चार बौद्ध असतील असे कायद्यात लिहिले आहे, का ? बद्रीनाथ असो, अयोध्या असो वा मक्का-मदिना असो, असा नियम कोणत्याही हिंदूच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू मानला पाहिजे. जो तुमचा करुणा, शांती आणि मैत्रीचा आदर्श आहे. त्याला अनुसरून आम्ही पटना गांधी मैदान (सम्राट अशोका मैदान ) येथे दिनांक : सप्टेंबर २०२४ रोजी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन व शांततापूर्ण मोर्चा काढत आहोत. या बैठकीत भन्तेगण व अनेक बौद्ध संघटनेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे पदाधिकारी उपस्थित होते. कोकण विभागातून राजेश पवार (भीमाई भूमी मुरबाड बाबासाहेबांचे आजोळ), मराठवाडा विभागातून सत्यजित साळवे ( क्रांतिभूमी औरंगाबाद ) येथून उपस्थितीत होते.

## उदगीर येथील बुध्द विहार उद्घाटन समारंभाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राहणार उपस्थिती

लातूर : - उदगीर येथे नगरपरिषदेने उभारलेल्या बुद्ध विहाराचे उद्घाटन ४ सप्टेंबर २०२४ रोजी होत आहे. या कार्यक्रमाला भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. तसेच यादिवशी राज्य शासनाच्यावतीने आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानालाही त्या उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.







या समारंभाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राज्य शासनाने उदगीर नगरपरिषदेला दिलेल्या निधीतून उदगीर शहरातील तळवेस येथे बुध्द विहाराचे बांधकाम करण्यात आले आहे. कर्नाटकातील कलबुर्गी येथील बुध्द विहाराची प्रतिकृती असलेल्या उदगीर येथील बुध्द विहाराचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत ४ सप्टेंबर रोजी होणार आहे. राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांच्या लाभार्थी महिलांचा गौरव ४ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत तयार करण्यात येत असून यासाठी जिल्हास्तरावर विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सर्व पथकांच्या प्रमुखांची बैठक घेवून मंगळवारी आढावा घेतला. तसेच प्रत्येक पथकाने आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पार पडण्याच्या सूचना केल्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह विविध अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## चेअरमन वैशालीताई देशमुख यांची हनुमान विद्यालयास सदिच्छा भेट

लातूर : प्रतिनिधी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, रीड लातूरच्या अध्यक्षा सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांनी मंगळवारी लातूर तालुक्यातील रमजानपूर आणि बोकनगाव येथील महिलांचा व बचत गटांच्या महिलांव्यानंतर लातूर तालुक्यातील बींदगीहाळ येथील हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाच्या हनुमान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास भेट दिली. या वेळी डॉ. सारिका देशमुख, शेषेराव पाटील, व्यंकटराव पाटील सी. बी. शेख, धनराज दाताळ, राजकुमार पाटील, संरपंच पुनम कांबळे, जयप्रकाश शिंदे, मुख्याध्यापक आर. आर. पाटील, लक्ष्मण शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राजकुमार पाटील, व्यंकटराव पाटील यांनी स्वागत केले या सस्थेंसाठी मुख्यमंत्री असताना विकासरत्न विलासराव देशमुख यांनी मोठे सहकार्य केले याचा संथेच्या सचिवांनी आवर्जुन उल्लेख केला. यावेळी बोलताना चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमूख म्हणाल्या



आदणीय विलासराव देशमूख आणि देशमूख परिवारांने नेहमीच विविध क्षेत्रात चांगल्या काम करणाजया व्यक्ती, संस्था आणि समाजाभिमूक उपक्रमाला सहकार्य केले आहे. या भागातील शेती आणि शेतकजयांचा विकास करण्यासाठी साखर उद्योगासोबत बराजेसेच्या माध्यमातून सिंचन सुविधा केल्या आहेत. आज माजी मंत्री अमित देशमुख, आमदार धीरज देशमुख आपल्या सर्वांसाठी चांगले काम करीत आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# डोक्याचं हेल्मेट

ट्रॅङ्गिक जसजशी वाढत चाललीये, तसतशा कटकटीही वाढत चालल्यात. 'रश अवर्स' म्हणजे धावपळीचे तास. पण, या तासांमध्ये 'धावपळ' दिसतच नाही. कारण वाहनांच्या गर्दीमुळं ट्रॅङ्गिक जवळजवळ ठप्पच झालेली असते. ट्रॅङ्गिकच्या बाबतीत अशा विसंगती पावलोपावली दिसून येतात. उदाहरणार्थ, जिथे 'नो एन्ट्री' असेल, तिथेच ट्रॅङ्गिक पोलिसांनी थांबणं आणि वाहनचालकांना रोखणं अधिक हितकारक नाही का? पण प्रवेशबंदी असलेला रस्ता सुरू झाल्यानंतर काही अंतरावर ते थांबतात. कदाचित त्यांना नियमांचं पालन नव्हे, उल्लंघन अपेक्षित असावं. कारण उल्लंघन झालं की दंड ठोकता येतो. नव्या वाहतूक कायद्यात तर दंडाची रक्कम मजबूत वाढवलीये. पार्किंगच्या पुरेशा सोयी नाहीत; पण 'नो पार्किंग'च्या पावत्या ङ्गाडणं सुरूच आहे.

गाडी चालवताना मोबाइलवर बोलू नये, हा नियम आहे. पण 'हँड्स-ङ्गी' संभाषण चालतं. जणू मोबाइलवर बोलताना ङ्गक्त हातच बिझी राहतात आणि कानांना, मेंदूला काही कामच नसतं, मग ड्रायव्हरचं लक्ष विचलित कसं होईल? नव्या महामार्गांवरच्या नियमांबाबत तर काय बोलावं! नव्वद वेगमर्यादा असल्याचा ङ्गलक दिसतो. ड्रायव्हर स्पीड वाढवतो. तेवढ्यात साठ वेगमर्यादा असल्याचा ङ्गलक एकाएकी समोर येतो. वेग अचानक कमीही करता येत नाही आणि नाही झाला, तर कॅमेरे टपलेले असतातच. दंडाचं चलन घरपोच! थोडक्यात, सोयींची वानवा असली तरी, गाडी चालवायची म्हटल्यावर इंधनाबरोबरच टोल आणि दंडाची रक्कम हिशोबात धरावी लागते.

शिस्तीसाठी नियम पाहिजेतच; पण अंमलबजावणीत शिस्त नसली तर हसावं की रडावं कळत नाही. नोएडाचंच उदाहरण घ्या. तिथल्या एका तरुणाला पोलिसांनी १००० रुपयांचा दंड ठोठावला. कारण होतं विनाहेल्मेट गाडी चालवणं. दंडाची नोटीस आपल्याला 'चुकून' आली असावी, असं समजून तरुणाने त्याकडे दुर्लक्ष केलं. कारण तो जी गाडी चालवत होता, ती दुचाकी नसून चारचाकी होती. ही चूक पोलिसांच्याही लक्षात येणं अपेक्षित होतं. परंतु नंतर वाहतूक अधिकार्यांनी ईमेल आणि मेसेजच्या माध्यमातून स्मरणपत्रं पाठवायला सुरुवात केली.

चारचाकी चालवताना हेल्मेटसक्तीचा नियम कधी झाला? या प्रश्नानं तरुणाच्या डोक्याचं हेल्मेट व्हायची वेळ आली. अखेरच्या स्मरणपत्रात पोलिसांनी तंबी दिली होती, की जर मुदतीत दंड भरला नाही, तर कोर्टात हजर व्हावं लागेल. मग त्यानेच पत्रव्यवहार करून या नव्या नियमाबद्दल स्पष्टीकरण मागितलं. कार चालवताना हेल्मेट आवश्यक आहे, असा नियम असेल तर कृपया मला कळवावे, असं त्याने पत्रात म्हटलंय. ट्रॅङ्गिक नियमांच्या अंमलबजावणीत अशा छोट्या-मोठ्या गमती होतच असतात. पण त्या लक्षात आल्यावर किमान स्मरणपत्रं आवरती घ्यायला नकोत का?


असं म्हणतात की स्पेनमध्ये अनवाणी पायांनी वाहन चालवणं बेकायदा आहे. थायलंडमध्ये सार्वजनिक वाहन चालवणार्यांना ड्रेसकोड आहे. जपानमध्ये तुमच्या गाडीने एखाद्या पादचार्याच्या अंगावर पावसाचं पाणी किंवा चिखल उडाला तर दंड होतो. स्वीडनमध्ये दिवसाही गाडीचे हेडलाइट चालू ठेवावे लागतात. मॉस्कोमध्ये मळलेली, खराब झालेली गाडी रस्त्यावर आणली तर दंड केला जातो आणि दुबईत घाण झालेली गाडी सार्वजनिक पार्किंगमध्ये लावली, तर दंड ठोठावतात.

# एक संवेदनशील अस्वस्थता : चिंतन एका कार्यकर्त्याचे

साथी सुनिल खंडाळीकर यांचे चिंतन कार्यकर्त्याचे' हे त्यांनी मांडलेल्या विविध विषयावर सखोल चिंतन करावे असे पुस्तक आहे. महाराष्ट्रातील बदलते राजकारण दुष्काळ, भूकंपाच्या नंतर निर्माण झालेले प्रश्न, राहून गांधी यांचे भात जोडो' जनआंदोलन, त्याचा भारतीय राजकारणावर झालेला परिणाम, स्वयंसेवी चळवळीत काम करतांना त्यांना जाणवलेले प्रश्न, सेक्स आणि ल व्ह जिहाद, दुष्काळ अशा अनेक राजकीय व सामाजिक प्रश्नांवर त्यांनी, आपल्या लेखात चिंतन मांडले आहे. त्या-त्या प्रश्नाला भिडून त्याचा सखोल विचार करुन, त्याचे गार शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ते एक कार्यकर्ते असल्याने, त्यांच्या लेखाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनास एक वजन प्राप्त झाले आहे.

सुनिल खंडाळीकर यांचा समविचारी म्हणून आणि चळवळीतला कार्यकर्ता म्हणून, माझा तीस-चाळीस वर्षांपासून संबंध आणि मैत्री आहे. अहमदपूरला असतांना विविध विषयांवर चर्चा करणे, राजकीय सामाजिक प्रश्नांवर चर्चा करुन, देशाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करणे. समाजाचे भले कसे होईल ? यासाठी समाजकारण, राजकारणाने कोणते वळण घेतले पाहिजे ? यांच्यावर त्याचे सतत चिंतन चाले. त्यातून आकाराला आलेले हे, अभ्यासपूर्ण लेख आहेत. ज्या-ज्या वेळी समाजात जे-जे प्रश्न निर्माण झाले. समाजकारण ढवळून निघाले. त्याचे पडसाद त्यांच्या मनावर उमटलेले आहे. संवेदनशील मन असल्याने, ते या प्रश्नांनी अस्वस्थ झालेले आहेत. पण केवळ भावनात्मक दृष्टी अस्वस्थ न होता, त्यांनी या प्रश्नांचा बारकाईने विचार केला आहे. आणि त्यामून या लेखांचा जन्म झालेला आहे. केवळ वाचन, चिंतन आणि विचारच नाही तर आयुष्यभर, त्यांनी स्वयंसेवी संघटनेमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. अनेक ठिकाणी हिंडून प्रत्यक्ष त्यांचा अभ्यास करुन, तेथील लोकांशी त्या प्रश्नांवर चर्चा करुन, त्यांनी निष्कर्ष काढले आहेत. त्यामुळे या लेखांना केवळ शाब्दिक मोल न येता, ते अनुभवाचे बोल झाले आहेत. समाजातील सामान्य माणसाचे प्रश्न घेऊन, त्यांनी विविध चळवळी केलेल्या आहेत. त्या संघर्षामध्ये त्यांनी, प्रत्यक्ष भाग घेतला आहे. अशी काम करतांना अंगावर येणाया, अनेक संघटाना त्यांनी तोंड दिले आहे. त्यातून तावून सुलाखून निघून, त्यांचा सच्चा कार्यकत्र्यांचा पिंड घडला आहे. आयुष्यभर त्यांनी हे जे काम केले, भोगले त्याच्यवर चिंतन, मनन केले. त्याला शब्दबध्द केल्याने आपण केलेले हे काम, पुस्तक रुपाने पुढे आणले तर, आपल्या सारख्या कार्यकत्र्यांचे लढणे, झगडणे समाजासमोर मांडता येईल. असे वाटल्यावरुन त्यांच्या या लेखांचा जन्म झाला आहे. त्यांनी हे लिहिले नसते तर एक विचारांचा, अनुभवांचा खजिनाच लुप्त झाला असता, असे मला त्यांचे लेख वाचतांना वाटले. म्हणून त्यांच्या लेखावर आपण ही दोन शब्द व्यक्त केले पाहिजेत व त्यांची वैचारिक साथ दिली पाहिजे. या भावनेतून हे लिहीले आहे.

सुनिल यांचे सजग मन राजकारणातील घडामोडीवर फार बारकाईने लक्ष ठेवते असे जाणवते. गेल्या दहा वर्षात भारतीय राजकारणाने एक मोठे वळण घेतले आहे. धर्मनिरपेक्ष राजकारणाकडून ते हिंदूत्वाकडे वळले आहे. अनेक वर्ष भारतावर राज्य करण्याचे आणि त्या निमित्तने, आपल्या पध्दतीने हिंदूत्ववादी राजकारण, देशात आणण्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघ भाजपचे स्वप्न होते. ते मधले काही वर्ष अटलबिहारींचे राज्य असले तरी ते मध्यम मार्गी असल्याने, सगळ्यांना घेऊन चालण्याच्या आणि लोकशाही पध्दतीने राजकारण करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे, पुरोगामी विचाराचे लोक त्यांच्या काळात इतके अस्वस्थ नव्हते. पण २०१४ साली मोदी पंतप्रधान झाले आणि कडवे हिंदूत्ववादी राजकारण देशात सुरु झाले. लोकांना भावानात्मकदृष्टएा शब्दात अडकवून राजकारण पुढे न्यायचे, हे त्यांचे धोरण यशस्वी झाले. त्यात मोदी-शहांच्या हुकूमशाही वृत्तीमुळे त्यांनी, आपल्या हातातील इडी, सीबीआय सरख्या संघटनाचाही, विरोधकांना संपवून टाकण्यासाठी उपयोग केला. त्यामुळे एक दहशतीचे वातावरण देशात निर्माण झाले. अल्पसंख्याकांच्या मनात भय निर्माण झाले. त्यात एक पक्षीय हुकूमशाही देशात आणावयाची, या भावनेतून शत प्रतिशत भाजप' अशा घोषणा सुरु झाल्या. त्यादृष्टीने पाऊले पडू लागली. इस बार चारसौ पार' च्या घोषणेने तर भारताची समाजवादी, धर्मनिरपेक्ष घटनाच बदलून टाकायची असे राजकारण सुरु झाले. लोकांचे जीवन-मरणाचे प्रश्न, शेतीमालाचे भाव, आरोग्याचे प्रश्न, रस्ते ई. प्रश्न बाजूला पडून केवळ धार्मिक प्रश्न उभे करुन, लोकांना भावनात्मकदृष्टएा संमोहित करुन सत्ता मिळवायाची. असा डाव टाकला गेला. पण तो २०२४ च्या निवडणूकीतील यशस्वी झाला नाही. २०१९ च्या निवडणूकीतील यशामुळे एक प्रकारचा हम करे सो कायदा' असा अहंकार मोदी-शहा यांच्यामध्ये आला. पण राहूल गांधी यांची भारत जोडो'' न्याय यात्रा, लोकांच्यामध्ये जावून, त्याचे प्रश्न समजावून घेण्याची वृत्ती, त्यामुळे अहंकारी राजाकरणाला आपण प्रेमाच्या राजकारणाने शह देऊ शकतो, हे भारताच्या शहाण्या जनतेच्या लक्षात आले. आणि त्यांनी चार सौ पार'' ला दोनशे चाळीस पर्यंत खाली म्हणून अहंकाराचा भोपळा फोडला. त्यात महाराष्ट्राच्या एकूण फोडाफोडीच्या राजकारणास जनता विटली होती. त्यात कांद्याच्या भावाचा प्रश्न, निर्यात बंदी, सोयाबीनचे कोसळलेले भाव




एकूणच मूळ प्रश्नाकडे, लक्ष न देणारे राजकारणी केवळ सत्तेसाठी साठमारी, आरक्षणाच्या नावाखाली मराठा व ओबीसी या दोन समाजात लावलेले भांडण, त्यामून समाजात निर्माण झालेली असुरक्षितता, त्याच्याबद्दल जनतेने अत्यंत हुशारीने, शांतपणे मतदानातून निर्णय घेतला आणि भल्याभल्यांच्या राजकारणाचे इमले धडाधडा कोसळले. केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांनाही जनतेने कसे ताळ्यावर आणले, ते महाराष्ट्रातील सत्तांतर आणि हिंदूत्वांचे राजकारण, कुठे नेऊन ठवेला आमचा महाराष्ट्र ?', २०२४ निवडणुकीत प्रस्थापितांचा पराभव करुन, विस्थापिताचा विजय इ. लेखातून सुनिल खंडाळीकर यांनी अभ्यासपूर्ण रितीने मांडले आहे. त्यातून त्यांचा राजकारणाचा अभ्यास व चिंतन लक्षात येते. या पुस्तकातील विचारांचे तसे तीन भाग पडतात. एक राजकीय प्रश्नांचा विचार, दुसरा सामाजिक प्रश्नांचा विचार आणि तिसरा एका कार्यकत्र्यांने केलेल्या कामाचे विश्लेषण. त्यांच्या राजकीय विचाराच्या प्रश्नाचे आणि त्यातून त्यांनी मांडलेल्या निष्कर्षाचे चिंतन, वरील विवेचनात मांडले आहे. तर सामाजिक प्रश्नावरील लेखात दुष्काळ, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न. शेतीच्या सिंचनाचा प्रश्न, अतिक्रमीत गायरानाचा प्रश्न, भूकंपामुळे निर्माण झालेले प्रश्न, पुर्नवसनात झालेले घोटाळे, विशेष म्हणजे या जीवन मरणाच्या प्रश्नातही, राजकारण आणून निर्माण केलेला धर्मांतराचा प्रश्न, भूकंपग्रस्त भागात ज्या स्वंयसेवी संघटना काम करीत होत्या. त्यात विविध विचारांच्या, धर्माच्या स्वयंसेवी संघटना होत्या. भूकंपग्रस्तांच्या पुर्नवसनाचे काम, प्रत्येकाने आपल्या सामथ्र्याप्रमाणे केले. पण त्यात ही ख्रिश्चन लोकांनी तिथल्या निराधार विद्याथ्र्यांना, शिकवण्याचे निमित्त करुन त्यांचे धर्मांतर केले. अशी हिंदुत्ववाद्यांनी उठलेली आवई, त्यावरुन विनाकारणच पुनर्वसनाच्या बिगर राजकीय विषयात आणलेले राजकारण आणि धर्मकारण. यातून उठलेले वादळ, यातून मूळ प्रश्न बाजुला पडून झालेले राजकारण, धर्मकारण किती क्लेशदायी होते ? याचे विवेचन सुनील खंडाळीकर यांनी केले आहे.

कार्यकत्र्याला आपल्या कामातून मिळालेल्या अनुभवाने व त्यात निर्माण झालेल्या प्रश्नांचे विवेचन, आपल्याला आलेल्या प्रत्यक्ष अनुभवातून खंडाळीकर यांनी मांडले आहे. त्यात अतिक्रमित गायरानाचा प्रश्न, बालमजुरी निर्मूलन, स्वयंसेवी चळवळ एक अवलोकन, नर्मदा प्रकल्पाच्या कामातून निर्माण केलेले राजकारण. सेक्स आणि लव्ह जिहाद मुळे, निर्माण झालेले प्रश्न आणि त्यातील खरे-खोटेपणा याचा पदामर्श त्यांनी घेतला आहे. बालमजुरी भूकंपग्रस्त पुनवर्सन अतिक्रमित गायरानचा प्रश्नावर तर, त्यांनी प्रत्यक्ष काम केलेले असल्याने, त्यांनी उपस्थित केले प्रश्न, त्यावरच्या अनुभवाला प्रत्यक्ष कार्याचे मोल आहे. या प्रश्नांचा त्यांनी किती बारकाईने विचार केला आहे, ते हे लेख वाचताना जाणवते.

विस्तार भयामुळे प्रत्येक लेखाचे सविस्तर विश्लेषण करणे शक्य नाही. पण त्यातून सुनिल खंडाळीकर यांची विचारसरणी, त्यांचे धर्मनिरपेक्षतेचे विचार, त्यांनी केलेले कार्य आणि त्यावर केलेला अभ्यास व चिंतन प्रकार्षाने जाणवते. साहित्यातल्या लेखापेक्षा हे अनुभवाचे बोल फार महत्त्वाचे आहेत. केवळ शब्दांचा फुलोरा न फुलवता लेखाची मांडणी, विश्लेषण, त्या प्रश्नांचे अभ्यासपूर्ण विवेचन, त्यावर सुचवलेले उपाय त्यामुळे या लेखाला पुस्तकांच्या शिर्षकाप्रमाणे, एका कार्यकत्र्यांच्या चिंतनाचे अभ्यासपूर्ण रुप प्राप्त झाले आहे. लेखाला साजेशी परखड भाषाशैली त्यांनी वापरली असली तरी, हे लिखाण कुठेही कंटाळवाणे होत नाही. एकूणच हे एका कार्यकत्र्यांचे चिंतन' आहे. याचे महत्त्व जाणून घेऊन या लेखाचे वाचन केले, तर पुस्तकाला न्याय दिल्यासारखे होईल. सामाजिक, राजकीय आणि स्वयंसेवी संघटनेतील कार्यकत्र्यांनी तर हे पुस्क आवर्जून वाचले पाहिजेच. पण सामाजिक, राजकीय प्रश्नांचा विचार करणाया त्या विषयी सजग जाणिवा असणाया वाचकांकडे नाही. हे पुस्तक वाचले पाहिजे इतके महत्त्वपूर्ण चिंतन, मनन आणि विवेचन या पुस्तकात आहे.


************

प्रा.निशिकांत देशपांडे,
लातूर.
मो.८३८१०५७६३१.

विशेष स्मरण विनंती;
महोदय,
कृपया सुनिल खंडाळीकर यांच्या या लेखसंग्रहाचा' प्रकाशन सोहळा लातूर येथे, दि.०१.०९.२०२३ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने सदर लेख प्रसिध्द करावा, ही नंम्र विनंती. धन्यवाद.

# भारत देशाला क्रीडाक्षेत्राचा मोठा वारसा!

व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी खेळाला अनन्य साधारण महत्त्व आहे. खेळाडू जीवनभर आरोग्यदायी राहतात. भारतामध्ये विविध क्रीडा प्रकार प्रसिद्ध आहेत. अनेक खेळाडू जागतिक स्तरावर चमकलेले आहेत. खेळ हा अनेक लोकांच्या आयुष्यातील अविभाज्य घटक असतो. प्रत्येकजण कोणता ना कोणतातरी खेळ प्रकार पसंत करतो. काहीजण खेळाची आवड करिअरच्या दिशेने पुढे नेतात. तर काही लोक आपल्या आवडत्या क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना फॉलो करत खेळाचा आनंद घेतात. देशाला क्रीडाक्षेत्राचा मोठा वारसा लाभलाय. यात हॉकीतील दिग्गज खेळाडू आणि जादूगार अशी ओळख असलेल्या मेजर ध्यानचंद यांना स्मरून राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व पटावे, यास्तव श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेखप्रपंच... संपादक.




लाखो देशवासियांसाठी प्रेरणादायी असलेले व्यक्तीमत्व दिवंगत धावपटू मिल्खा सिंग यांच्यासह पी.टी.उषा यांना उडनपरी या नावाने संबोधले जाते, तर सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा देव तथा मास्टर ब्लास्टर म्हटले जाते. राष्ट्रीय क्रीडा दिवस २९ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येतो, का? तर महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा हा जन्मदिन आहे, म्हणूनच तो दिवस क्रीडादिन म्हणून देशभरात साजरा करण्यात येतो. राष्ट्रीय क्रीडा दिनी व्यक्तीच्या जीवनात खेळांच्या महत्त्वाबाबत जनजागृती केली जाते. तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी सर्वांनी खेळ खेळले पाहिजेत, असा संदेश दिला जातो. या दिवशी राष्ट्रपती देशातील क्रीडा क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना खेलरत्न, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार देऊन गौरव करतात.

मेजर ध्यानचंद हे हॉकीमध्ये जगभरात गाजलेले नाव आहे. त्यांना हॉकीचे जादुगार म्हणून ओळखले जाते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सन १९२२मध्ये वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ते भारतीय लष्करात रूजू झाले. त्यांच्यामध्ये एका खेळाडूचे सर्व गुण होते. लष्करातील सुभेदार मेजर मनोज तिवारी यांनी हॉकी खेळण्यासाठी ध्यानचंद यांना प्रवृत्त केले, त्यांना प्रोत्साहन दिले. स्वत: तिवारींना सुद्धा खेळांमध्ये आवड होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यानचंद यांनी हॉकी खेळण्यास सुरुवात केली. देशातीलच नव्हे तर जगातील महान हॉकीपटूंच्या यादीत अव्वलस्थानी त्यांचे नाव आले. त्यांना पहिल्यापासूनच खेळाची आवड होती. ते एक उत्तम खेळाडू होते. पण त्यांना हॉकीची प्रेरणा मिळाली ती सुभेदार मेजर तिवारी यांच्याकडून, जे स्वत: क्रीडाप्रेमी होते. खेळांमध्ये उत्कृष्ट असल्यामुळे ध्यानचंद यांची १९२७ साली बढती लान्स नायक पदावर झाली. त्यानंतर १९३२ साली नायक पदावर तर १९३६ साली हॉकी टीमचे कॅप्टन असताना त्यांची सुभेदार पदावर बढती झाली. नंतर लेफ्टनंट पदावरून त्यांची बढती मेजर म्हणून झाली. ते हॉकी खेळण्यात अतिशय निपूण होते. त्यांना देशातील सर्वकालीन उत्कृष्ट हॉकी खेळाडू समजले जाते. हॉकी खेळताना चेंडूवर नियंत्रण मिळवण्यात, फटका मारण्यात, विरोधी खेळाडूकडून अलगद चेंडू काढून घेण्यात, एखादा नवीनच सर्जनशील फटका मारण्यात ते माहीर होते. त्यांनी भारतीय हॉकीला सर्वोच्च स्थानावर नेऊन ठेवले. ऑलम्पिकमध्ये भारताला हॉकीत त्यांनी ३ सुवर्ण पदके मिळवून दिली. सन १९२८, १९३२ आणि १९३६ साली भारताने हॉकीतील सुवर्ण पदक जिंकण्याची कामगिरी केली. २२ वर्षाच्या कारकीर्दीत त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चारशेपेक्षा जास्त गोल केले, तर कारकीर्दीत एक हजारांपेक्षा जास्त गोल केले. सन १९२६ ते १९४८ या काळात त्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्राला एक नवी उंची गाठून दिली. त्यांच्यापासून अनेक खेळाडूंनी प्रेरणा घेतली. राष्ट्रीय क्रीडा दिन २९ ऑगस्टला देशपातळीवर साजरा केला जातो. राष्ट्रपती भवनात या दिवशी समारोह आयोजित केला जातो. क्रीडा क्षेत्रातील मानाचे पुरस्कार विविध खेळाडूंना दिले जातात. खेळाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्याबरोबरच या दिनी मेजर ध्यानचंद यांचे खेळातील योगदान अधोरेखित केले जाते. भारताची समृद्ध क्रीडा संस्कृती आणि वारशात ध्यानचंद यांनी दिलेल्या योगदानाला उजाळा दिला जातो. ध्यानचंद एकमेव खेळाडू आहेत, त्यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाला आहे.

उत्तर प्रदेशमधील प्रयागराज, अलाहाबाद येथील एका राजपूत परिवारात दि.२९ ऑगस्ट १९०५ रोजी मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सामेश्वर सिंह हे भारतीय सेनेत होते. ध्यानचंद देखील आपल्या वडिलांप्रमाणेच भारतीय सेनेत दाखल झाले आणि येथूनच त्यांचा हॉकी प्रवास सुरू झाला. त्यांचे खरे नाव ध्यानसिंह असे होते. मात्र ते नेहमी चंद्राच्या प्रकाशात हॉकीचा सराव करीत असत. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना चंद म्हणण्यास सुरुवात केली. नंतर ते ध्यानचंद या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांनी सन १९२८, १९३२ आणि १९३६ या सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धात हॉकीमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आणि त्यांत विजय मिळवून दिला. बर्लिन ऑलिम्पिक १९३६मध्ये भारतीय संघाने जर्मनीचा हुकूमशहा अडॉल्फ हिटलरच्या उपस्थितीत जर्मन संघाला अंतिम फेरीत ८-१ अशी धूळ चारली होती. या विजयासह सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धात सुवर्णपदक जिंकून अनोखी किमया साधली. मेजर ध्यानचंद यांनी आंतरराष्ट्रीय हॉकीतील त्यांच्या २२ वर्षाच्या कारकीर्दीत चारशेपेक्षा जास्त गोल करत आपण गोल मशीन असल्याचे सिद्ध केले होते. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना त्यांच्या हॉकी खेळातील योगदानासाठी पद्मभूषण या सन्मानाने भुषविले, तर भारतीय टपाल सेवेने त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. ध्यानचंद हे भारतीय सेनेतून मेजर या पदावर असताना निवृत्त झाले. आपल्या निवृत्तीनंतर देखील ध्यानचंद यांचे हॉकीतील योगदान कायम राहिले. पटियालामधील राष्ट्रीय क्रीडा संस्थानमध्ये ते हॉकीचे मुख्य प्रशिक्षक होते. शिवाय त्यांनी राजस्थानमधील बऱ्याच प्रशिक्षण कॅम्पमध्ये देखील प्रशिक्षण दिले. सन २००२ साली दिल्लीतील नॅशनल हॉकी स्टेडिअमचे नामकरण मेजर ध्यानचंद नॅशनल हॉकी स्टेडिअम असे करण्यात आले.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरी करण्यात येते. हॉकीच्या मैदानात ध्यानचंद यांनी अविश्वसनीय कामगिरीची नोंद केली. त्यांच्या कारकिर्दीत भारताने ऑलिम्पिक स्पर्धेत तीन वेळा गोल्डन कामगिरी नोंदविली. दशकानंतही त्यांची जादू कायम आहे. मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. सरकारतर्फे सन १९५६मध्ये त्यांना देशातील सर्वोच्च नागरिपुरस्कार असलेला पद्मभूषण देऊन गौरवण्यात आले. त्यांच्यातील कौशल्याबाबत बोलताना स्टिकला चेंडू जणू चिटकलेला असायचा, असे वर्णनही ऐकायला मिळते. एकदा तर चक्क त्यांची हॉकी स्टिक तोडून त्यांत चुंबकिय किंवा अन्य काही गोष्टीचा वापर करण्यात आलाय का? हे पाहण्यात आले होते. ध्यानचंद यांनी सन १९२६ ते १९४८ दरम्यान चारशेहून अधिक सामने खेळले. यात त्यांनी जवळपास हजार गोल डागण्याचा पराक्रम केला. हॉकीच्या मैदानात अभूतपूर्व कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यासाठी सन २०१२पासून भारत सरकारने त्यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. ऑलिम्पिक स्पर्धेत हॉकी संघाने ऐतिहासिक ब्राँझ पदक पटकावल्यानंतर क्रीडा क्षेत्रात राजीव गांधी यांच्या नावाने दिल्या जाणार्या सर्वोच्च खेलरत्न पुरस्काराला त्यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचे दि.३ डिसेंबर १९७९ रोजी निधन झाले होते. !! मेजर ध्यानचंद यांना आणि त्यांच्या हॉकी कौशल्याबद्दल विनम्र अभिवादन तथा सर्व क्रीडाप्रेमींना राष्ट्रीय क्रीडादिन निमित्ताने हार्दिक शुभेच्छा !!

***********

- संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली,
फक्त व्हॉटसप- ९४२३७१४८८३.

# भारताचं नावलौकिक करणारा क्रीडापटू : ध्यानचंद

मेजर ध्यानचंद मैदानी हॉकीपटू हे आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट खेळाडू असल्याचे अनेकांचे मत आहे. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद येथे कुशवाह राजपूत कुटुंबात झाला. ते रामेश्वर सिंह आणि शारदा यांचे पुत्र होते. मूल सिंग आणि रूप सिंग हे ध्यानचंद यांचे दोन भाऊ. नंतरचे एक हॉकीपटू तसेच, फील्ड हॉकीमध्ये भारतासाठी स्पर्धा केली आणि १९३२ आणि १९३६ ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदके जिंकली. चंदच्या वडिलांनी ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा दिली, जिथे ते हॉकी संघाचे सदस्य होते. चंद त्याच्या अपवादात्मक चेंडू हाताळणी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध होते. या विजयांच्या पलीकडे, त्याचा प्रभाव १९२८ ते १९६४ दरम्यान झालेल्या आठ ऑलिम्पिकमध्ये दिसून येतो, जिथे भारताने सात वेळा फील्ड हॉकी स्पर्धा जिंकली.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा विविध देशांमध्ये राष्ट्रीय क्रीडा संघ आणि त्या देशांच्या क्रीडा परंपरांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे. या दिवशी विविध वयोगटातील लोक खेळांमध्ये भाग घेतात. दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. ध्यानचंद या दिवशी जन्मलेल्या सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक. हा दिवस भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये तीनदा सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या आत्मचरित्र 'गोल्स' नुसार त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत १९२६ ते १९४९ मध्ये ९०० गोल केले. त्यांनी त्यांच्या घरच्या आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८५ सामन्यांमध्ये ५७० गोल केले. १९५६ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण, भारतातील तिसरा-सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला, त्याच वर्षी ते मेजर पदासह सैन्यातून निवृत्त झाले.

राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम आणि शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांमध्ये उपक्रमांसह साजरा केला जातो. इव्हेंटमध्ये वारंवार मॅरेथॉन, शाळांमधील फिटनेस स्पर्धा, थलीट श्रद्धांजली समारंभ आणि फिटनेस आव्हाने यांचा समावेश होतो. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन ची थीम 'प्रमोशन आणि शांततापूर्ण आणि समावेशक समाजासाठी खेळ' आहे. ही थीम थलेटिक्स सामाजिक बंधने कशी मजबूत करू शकतात, व्यक्तींना एकत्र आणू शकतात आणि सर्वसमावेशकता आणि शांतता वाढवण्यासाठी समुदायांना आवश्यक असलेली साधने कशी देऊ शकतात यावर प्रकाश टाकते.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील खेळ जगतातला सर्वात उच्च पुरस्कार आहे. ध्यानचंद पुरस्कार अधिकृतपणे क्रीडा व खेळांमधील 'ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार' हा खेळ जगतातील आजीवन कर्तृत्वासाठीचा भारतीय सरकार तर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. १९२६ ते १९४८ या काळातील २० वर्षांपेक्षा जास्त कारकिर्दीत १००० पेक्षा अधिक गोल नोंदविणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांच्या नावावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्रीडा व युवा मंत्रालयाद्वारे सादर केला जातो. पहिला पुरस्कार हा २००२ साली देण्यात आला होता. ह्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी होते शाहूराज बिराजदार (मुष्टियुद्ध), अशोक दिवाण (हॉकी) आणि अपर्णा घोष (बास्केटबॉल). दरवर्षी हा पुरस्कार ३ ते ५ खेळाडूंना देण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद हे दिग्गज होते. १९२८, १९३२ आणि १९३६ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताच्या पहिल्या ऑलिम्पिक हॅट्रिकमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ध्यानाला चांद म्हणून ओळखले जात असे कारण तो दिवसभराच्या नियमित कामानंतर रात्री हॉकीचा सराव करत असे. त्याच्या कलेबद्दलचे समर्पण दाखवून खेळाडूंचे आश्चर्यकारक पराक्रम आणि त्यांचा समाजावर खोल प्रभाव, त्यांच्या वचनबद्धतेची आणि अपवादात्मक कामगिरीची आठवण करून देणारा हा महत्त्वाचा दिवस आहे. क्रीडा जगतात अमिट छाप सोडणाऱ्या खेळाडूंनाही हा दिवस श्रद्धांजली अर्पण करतो.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आम्ही भारतीय खेळाडूंच्या कर्तृत्वाचा गौरव करतो आणि आपल्या संस्कृतीतील खेळांच्या मूल्याबद्दल जागरुकता निर्माण करतो. याशिवाय मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा आणि भारतीय खेळांसाठीच्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात अनेक क्रीडा उपक्रम होतात. वय, लिंग किंवा क्षमता पातळी विचारात न घेता, कोणीही या इव्हेंटमध्ये सहभागी होऊ शकतो. लोकांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हे ध्येय आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी प्रमुख ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केले जातात. ज्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केली आहे ते ही पारितोषिके मिळविण्यास पात्र आहेत, जे भारतीय क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठे सन्मान आहेत.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा थलेटिसिझम, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीचा देशव्यापी उत्सव असल्याचे वचन देतो. दिवंगत भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना सन्मानित करणाऱ्या या वार्षिक सोहळ्यात, सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्यासाठी खेळाचे महत्त्व मान्य करण्यासाठी देशभरातील समुदाय एकत्र येतील. युनिव्हर्स पब्लिक स्कूल राष्ट्रीय क्रीडा दिन २०२४ मोठ्या उत्साहात आणि जोमाने साजरा करण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या मूल्यावर भर देण्यासाठी या वर्षीच्या उत्सवाचा भाग म्हणून अनेक रोमांचकारी कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय क्रीडा दिन हा खेळाडूंच्या भावनेचा आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वाचा उत्सव आहे. संघटित होण्याची, आमच्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची आणि क्रीडा नायकांच्या आगामी पिढीला प्रेरित करण्याची ही वेळ आहे. त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, भारताने २०१२ मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनाची स्थापना केली. क्रीडा नायकाला श्रद्धांजली अर्पण करणे आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यावर भर देऊन, दैनंदिन जीवनातील खेळांच्या मूल्याबद्दल जनजागृती करणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहेत. या दिवशी, प्रमुख क्रीडा तारे भारताच्या राष्ट्रपतींकडून खेलरत्न, अर्जुन, द्रोणाचार्य आणि ध्यानचंद पुरस्कार यासारखे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त करतात. ध्यानचंद यांचा मृत्यू ३ डिसेंबर १९७९ रोजी झाला. आज त्यांच्या जयंती निमित्त सर्वांना 'राष्ट्रीय क्रिडा दिनाच्या' हार्दिक शुभेच्छा !

*******

जीवनाच्या या पथावर, थांबला तो संपला।
राहिला चालत निरंतर, तोच येथे जिंकला।।

# आंबेडकरवादी महिलांचा शिवसेना (ए. शिंदे) गटात जाहीर पक्ष प्रवेश



नवी मुंबई / के. एच. हनवते :- नवी मुंबई बेलापूर विधानसभा क्षेत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे एकनिष्ठ उपनेते, माजी आयुक्त विजय नाहटा यांच्या समाजसेवी वृत्तीचा फायदा शिवसेनेला होत आहे, अनेक पक्षातील प्रमुख कार्यकर्ते विजय नाहटा यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश घेत आहेत. तुर्भे हनुमान नगर, इंदिरा नगर, आंबेडकर नगर मधील प्रमुख महिला कार्यकर्त्यांनी नुकताच शिवसेना एकनाथ शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश घेतला त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आली. शिवसेना महिला जिल्हाप्रमुख सरोजताई पाटील यांनी विविध पदे देऊन सन्मान केला. वंचीत पक्षातील सौ.कमलताई मस्के, पंचशीला पवार, पूनम गवारे, विद्या मते, स्वरा सकपाळ, जयश्री गायकवाड, कमला टेंकाळे, लक्ष्मी सातपुते आदी महिलांच्या समवेत शेकडो महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला. कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्यराव, विजय माने, आयोजक सिध्दार्थ साळवी उपस्थित होते.

# या कारणांमुळे उद्भवतात श्वसनाच्या समस्या



पावसाळ्यात धूलिकण, परागकण, हवेतील ओलसरपणा, प्रदूषके या कारणांमुळे श्वसनाच्या समस्या उद्भवतात. त्यामुळे पावसाळ्यात सामान्य सर्दी- पडसे, न्यूमोनिया, ब्राँकायटिस आणि दमा यासारख्या श्वसन संक्रमणाचा धोका वाढतो. हवामान आणि तापमानातील बदल हे जंतू आणि जीवाणूंच्या वाढीसाठी उत्तम ठरते. पावसाळ्यात श्वसनासंबंधी आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. वापरलेल्या टिश्यूची योग्य विल्हेवाट लावणे, वारंवार हात स्वच्छ धुणे आणि हवेतील रोगजंतू आणि विषारी द्रव्यांचा थेट संपर्क कमी करण्यासाठी गरज भासल्यास मास्कचा वापर करून स्वच्छता राखण्याचा सल्ला दिला जातो.

पावसाळ्यातील श्वसन संक्रमण

सर्दी-पडसे : पावसाळ्यात आढळणारा श्वसन संसर्ग सर्वात सामान्यपणे आढळणारा प्रकार आहे. हवामानातील संक्रमणकालीन बदलामुळे विषाणूंच्या अनेक प्रकारांमुळे सर्दी होऊ शकते. कोणत्याही वयाच्या व्यक्तीला सर्दीची लागण होऊ शकते.

यामध्ये छातीत घरघर, घसा खवखवणे, खोकला, सर्दी, डोकेदुखी आणि नाक वाहणे यासारख्या लक्षणांचा समावेश होतो. डॉक्टरांनी सांगितलेली आवश्यक खबरदारी आणि औषधे घेतल्यानंतर काही दिवसांत लक्षणे कमी होतात.

न्यूमोनिया : हा फुफ्फुसाचा गंभीर संसर्ग आहे, ज्यामुळे अस्वस्थता आणि श्वसनासंबंधी विकार होतो. यामुळे पावसाळ्यात वाढलेल्या ओलाव्यामुळे आणि वातावरणातील ओलसरपणामुळे न्यूमोनिया होण्याचा धोका वाढतो. या काळात लोकांना सावध राहण्याचा सल्ला दिला जातो. कारण, ते संक्रमित व्यक्तीकडून इतर व्यक्तीमध्ये पसरू शकते. ब्राँकायटिस : यामुळे फुफ्फुसातील वायुमार्गात तीव्र जळजळ होते. या जळजळीमुळे एखाद्याला खोकला येऊ शकतो आणि श्वास घेण्यास त्रास होतो. ब्राँकायटिसमुळे श्वासनलिका अरुंद होते आणि फुफ्फुसातील हवेचा प्रवाह मर्यादित होतो. दमा : पर्यावरणीय घटक तसेच जीवनशैलीतील बदलामुळे पावसाळ्यात दम्याची लक्षणे वाढू शकतात. वाढलेली आर्द्रता, ओलावा आणि वातावरणातील दबाव श्वसनमार्गात अडथळा निर्माण करू शकतो, ज्यामुळे श्वास घेणे नेहमीपेक्षा कठीण होते. पावसाळ्यातील सोसाट्याचा वारा हवेत बाष्प, परागकण आणि धुळीचे कण पसरवू शकतात.

हे कण सहजपणे श्वासावाटे आत घेतले जातात. कारण, ते आकाराने लहान असतात. त्यामुळे श्वसनासंबंधी विकार उद्भवतात. भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी सोबत इनहेलर बाळगावे. पाळीव प्राण्यांशी जवळचा संपर्क टाळावा. कारण, त्यांचा कोंडा आणि लाळ तुमची लक्षणे आणखी वाढवू शकतात. पावसाळ्यात उबदार व गरम कपडे वापरावीत.

# म्युच्युअल फंडावर कर्ज कसे मिळते?

म्युच्युअल फंडावर ऑफलाईन आणि ऑनलाईन असे दोन प्रकारे कर्ज मिळू शकते. बँका शक्यतो ऑफलाईन कर्ज देतात. म्युच्युअल फंड गुंतवणूक स्टेटमेंट घेऊन संबंधित कर्जाच्या अर्जावर सह्या घेऊन म्युच्युअल फंड कंपन्यांना गुंतवणुकीवर बोजा नोंद करण्याबाबत कळवितात व युनिटवर तारण नोंद करतात. मग, गुंतवणुकीवर बँकेचा बोजा चढवला जातो आणि कर्ज मंजूर केले जाते. प्रत्येकाचे आयुष्य हे अनपेक्षित घटनांनी भरलेले आहे. जीवनात अशा काही घटना घडतात की, अचानक तुमच्या समोर पैशाचे संकट उभे राहते. चांगल्या किंवा वाईट घटनेसाठी मोठा पैसा मोजावा लागतो. उदा. कुटुंबातील सदस्यांचे अपघात, मोठे आजारपण, धार्मिक कार्य, घराची पडझड, वाहन दुरुस्ती, जागा खरेदी, सोने खरेदी, नातेवाईकांना मदत, कुटुंबातील लग्न, मुलांचे शिक्षण, नैसर्गिक आपत्ती असे अनेक प्रसंग पूर्वसूचना न देता येतात. त्यावर मात करण्यासाठी पैशाच्या मोठ्या तरतुदीची गरज भासते. ही गरज पूर्ण करताना सर्वप्रथम आपण आपल्या जवळची रोख रक्कम खर्च करतो. मग, मित्रांकडून उसने घेतो, पर्सनल लोन घेतो, बँकेच्या मुदत ठेवीवर किंवा सोने तारण ठेवून कर्ज घेतो किंवा म्युच्युअल फंडातील गुंतवणूक काढून घेतो. मुळात आपल्या कुटुंबाचे आपत्ती व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन करणे या दोन गोष्टीला आर्थिक नियोजनामध्ये अन्यन्य महत्त्व आहे. याचे काटेकोर नियोजन केले पाहिजे. अनपेक्षित घटनांवर मात करण्यासाठी म्युच्युअल फंडातील गुंतवणूक काढण्याऐवजी त्यावर कर्ज काढून ही गरज भागवता येते आणि हे फार फायदेशीर ठरते. कसे ते आपण पाहू! मध्यम ते दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्णत्वासाठी इक्विटी म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करणे खूपच फायदेशीर ठरते. इक्विटी म्युच्युअल फंडात दरमहा सातत्याने गुंतवणूक केली, तर मोठी संपत्ती निर्माण करता येते. ही गुंतवणूक करताना आपल्याला अचानक पैशाची गरज भासली, तर त्यावर कर्ज घ्यावे. गुंतवणूक काढून घेण्याची चूक करू नका. कारण, यातून मिळणार्या चक्रवाढ व्याजाची ताकद ही दीर्घकालामध्ये मोठी संपत्ती निर्माण करते; मात्र गुंतवणूक काढून घेतली, तर मोठी संपत्ती निर्माण करण्याचे स्वप्न भंग पावते. संपत्ती निर्मितीची प्रक्रिया बंद पडते. याची योग्य माहिती हवी.

एक उदाहरण पाहू. माझे एक मित्र संकेत आज वय ४५ वर्षे आहे. ते वयाच्या ३५ वर्षांपासून म्हणजेच २०१५ पासून आपल्या रिटायरमेंटसाठी दर महिन्याला ५० हजागर रुपयांची एसआयपी इक्विटी फंडात गुंतवणूक करीत आहेत. सध्या त्यांची एकूण गुंतवणूक ५४ लाखांची असून त्याचे बाजारमूल्य १०८ लाख रुपये इतके झाले आहे. संकेतने रिटायरमेंटसाठी वयाच्या ५५ व्या वर्षी ६ कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे; पण सध्या त्यांच्या जवळच्या नातेवाईकाचे गंभीर आजाराचे निदान झाले असून, त्यांना उपचारासाठी २५ ते ३० लाखांची गरज आहे. या खर्चाच्या तरतुदीसाठी पैसे म्युच्युअल फंडातून उपलब्ध करावेत म्हणून ते आपली गुंतवणूक काढण्यासाठी आले असता त्यांना या गुंतवणुकीवर कर्ज काढून पैसे उपलब्ध करून दिले. कारण, आता ३० लाख रुपये काढून दिले, तर चक्रवाढ व्याजाच्या परिणामाने येणार्या ११ वर्षांतील त्यांचे १ कोटी ३९ लाखांचे नुकसान झाले असते. ही गोष्ट त्यांना समजावून सांगून म्युच्युअल फंडावर त्वरित कर्ज मिळवून दिले. या कर्जावर दर महिन्याला फक्त व्याज भरत राहिले, तरी चालते. जेव्हा-जेव्हा पैसे येतील तेव्हा तेव्हा त्यांना कर्जाची रक्कम भरता येते. या निर्णयाने संकेत यांना निरंतर गुंतवणूक करून त्यांना त्यांचे दीर्घकाळातील वृद्धापकाळाचे उद्दिष्ट कमी गुंतवणुकीमध्ये साध्य करत मोठी संपत्ती निर्माण करण्याचे कार्य सहजपणे साध्य होणार आहे. म्युच्युअल फंड मालमत्तेवरील तारण कर्जास म्हणतात. वैयक्तिक गुंतवणूकदार, एनआरआय, व्यवसायधारक, हिंदू अविभक्त कुटुंबप्रमुख ट्रस्ट, कॉर्पोरेशन कंपन्या आणि इतर संस्थांसाठी कर्जाची ही सुविधा उपलब्ध आहे; परंतु अल्पवयीन गुंतवणूकदारांना हे कर्ज मिळू शकत नाही. इथे तुमचा सिबिल स्कोर चांगला पाहिजेच असे नाही. कमी स्कोर असला, तरी तुम्हाला कर्ज मिळू शकते. म्युच्युअल फंडावर ऑफलाईन आणि ऑनलाईन असे दोन प्रकारे कर्ज मिळू शकते. बँका शक्यतो ऑफलाईन कर्ज देतात.

# नवी मुंबई येथे भारतीय बौध्द महासभेचा २७ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा.





नवी मुंबई / के. एच हनवते :- दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने व जिल्हा महिला कमिटीच्या विद्यमाने दिनांक : २५ /०८ /२०२४ रोजी प्रशस्त अशा बुद्धप्रतिष्ठान अशोका बँक्वेट हॉल सेक्टर १५ वाशी, नवी मुंबई येथे मोठया जल्लोशात भारतीय बौद्ध महासभेचा २७ वा वर्धापनदिन सोहळा संपन्न झाला. सदर कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक व प्रमुख अतिथी म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्षस : डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आदर्शांची पुजा करून व दिपप्रज्वलन करून सामुहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयवंत लव्हांडे गुरुजी ( जिल्हाध्यक्ष – नवी मुंबई ) यांची निवड करण्यात आली. अनुमोदन सुनिताताई सुरवसे ( कोषाध्यक्ष – नवी मुंबई जिल्हा – महिला ) यांनी दिले. समता सैनिक दलाने डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांना कडक सलामी दिली. तद्नंतर वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलिप (भाई) बंदीचोडे यांनी या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक : मान. भिमराव यशवंत आंबेडकर साहेबांचे हार्दिक स्वागत केले. त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयु. शोभाताई कांबळे ( नवी मुंबई महिला –जिल्हाध्यक्ष ) यांनी मागील २६ वर्षाची नवी मुंबई जिल्हयाने माझी जिल्हाध्यक्ष व सध्याचे विद्यमान जिल्हाध्यक्ष यांनी नवी मुंबई जिल्हयात भरघोस केलेल्या विस्तृत कार्याचा वृत्तांत सविस्तरपणे सांगीतला. उपस्थित मान्यवरांचा जिल्हयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. आजच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सचिव डॉ. डव्होकेट जगदीश गवई गुरुजी, बी. एच. गायकवाड गुरुजी ( राष्ट्रीय – सचिव ), आय. रागिणीताई पवार ( उपाध्यक्ष –केंद्रिय महिला विभाग ), भारतीताई शिराळ (केंद्रिय महिला विभाग सचिव ), यु. जी. बोराडे गुरुजी (उपाध्यक्ष – संस्कार महाराष्ट्र ), महाराष्ट्र राज्याच्या महिला अध्यक्षा : स्वातीताई शिंदे, व तसेच स्वातीताई गायकवाड (संस्कार – सचिव – महिला विभाग महाराष्ट्र ), सचिव – ड. मिताताई गंगावणे (सचिव – पर्यटन महाराष्ट्र ), महादेव गायकवाड गुरुजी ( सचिव – पर्यटन मुंबई प्रदेश ), प्रामुख्याने धम्मपिठावर उपस्थित होते. त्याचप्रमाणे माजी जिल्हाध्यक्ष आनंदबोधी निकाळजे गुरुजी ( माजी जिल्हाध्यक्ष ), अनिल शिंदे गुरुजी ( माजी जिल्हाध्यक्ष ), खरात गुरुजी ( माजी जिल्हाध्यक्ष ), प्रामुख्याने धम्मपिठावर उपस्थित होते. डव्होकेट एस. के. भंडारे (केंद्रिय कार्यालय प्रमुख), सुषमाताई पवार (केंद्रिय महिला विभाग प्रमुख ) व भिकाजी कांबळे गुरुजी (अध्यक्ष – महाराष्ट्र ) हे पदाधिकारी काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमास उपस्थित राहु शकले नाहीत. उपस्थित मान्यवरांनी धम्मचळवळ गतिमान करण्यासाठी वर्धापनदिनानिमित्त उर्जात्मक शुभेच्छा पर समयोचित व अप्रतिम असे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी करून धम्मचळवळ जोमाने पुढे नेण्याचा संदेश दिला. वर्धापन दिनाचे आयोजन, नियोजन सुरेख केल्यामुळे नवी मुंबई जिल्हयाचे सर्व उपस्थित मान्यवरांनी गोड कौतुक केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातु डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर साहेब ( राष्ट्रीय कार्याध्यक्ष – दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तद्वतच राष्ट्रीय – अध्यक्ष – समता सैनिक दल ) यांनी नवी मुंबई जिल्हयाच्या २७ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात धम्मचळवळ ही सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीचा पाया आहे. असे उद्देशुन विचार व्यक्त केले. त्यांच्या प्रभावशाली वक्तृत्वामुळे संपुर्ण उपस्थित स्तब्ध राहुन भारावुन गेले. अप्रतिम धम्मामृत त्यांनी देवुन धम्म कार्य जोमाने पुढे नेण्यासाठी सर्वांमध्ये ऊर्जा प्राप्त केली. त्यांनी पुढे सांगितले धम्म चळवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केली. पुढे भारतभर बौद्ध धम्मदिक्षा सोहळे घेवुन सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांनी धम्मचळवळीचा पाया मजबुत केला. तदनंतर पुढे ४५ वर्षापर्यंत भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय संरक्षक ममतासागर महाउपासिका आयु. मिराताई यशवंत आंबेडकर यांनी २४ प्रकारच्या शिबिराच्या माध्यमातुन बौद्ध धम्मचळवळ देशाच्या २८ राज्यांमध्ये नेली. मिराताई आंबेडकर यांच्याबरोबर अनेक कार्यकर्त्यांनी अडचणींवर मात करून हजारो कार्यकर्ते यांनी धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे अभिनंदन केले. व विशेष अभिनंदन नवी मुंबई जिल्हा कमिटीचे व महिला कमिटीचे केले. त्याचप्रमाणे डॉ. अनंत हर्षवर्धन (अध्यक्ष – बुद्ध – प्रतिष्ठान ) व त्यांची कार्यकारिणी यांचे अभिनंदन व कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जयवंत लव्हांडे गुरुजी यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना सांगीतले की, नवी मुंबई जिल्हा १ नंबरवर आणण्याकरीता आंम्ही कठोर मेहनत घेवुन चांगले काम केलेले आहे. त्यामध्ये संपुर्ण शाखांची मेहनत त्यांची काम करण्याची कार्यशैली, केंद्रिय शिक्षक, केंद्रिय शिक्षिका, बौद्धाचार्य, बौध्दाचार्या, मा. श्रामनेर, श्रामनेरी, सैनिक, उपासक व उपासिका सर्वांच्या सहकार्यामुळे हे काम करण्याची उर्जा मिळाली. सर्व दानदात्यांनी भरभरुन सहकार्य केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे गोडभरून कौतुक केले. अनेक शिबीरे राबवुन, शाखांची मजबुत बांधणी करुन, पर्यटन काढुन लेखाजोगा व्यवस्थीत करुन पारदर्शक काम करून नवी मुंबई जिल्हयाला पुढे आणण्याचे काम आमच्या कार्यकारिणीने व महिला कार्यकारिणीने केलेले आहे. त्यांच्या कार्याचा वृत्तांत त्यांनी विस्तृतपणे सर्वांसमोर सांगीतला. डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांनी दोन्ही नवी मुंबई जिल्हाध्यक्षांचे स्वागत करून मा. श्रामनेरी यांचे स्वागत केले. नवी मुंबई जिल्ह्यातुन विविध शाखांतील विभागनिहाय गुणवंत विद्यार्थी, डव्होकेट; डॉक्टर व इंजिनियर यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. आदर्श शाखा म्हणुन तथागत महाविहार सेक्टर – १२ या शाखेचा गौरव करण्यात आला. विशेष सहकार्य म्हणून पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर्स या शाखेचा सन्मान करण्यात आला. विविध शाखा व त्यांचे प्रमुख पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन : ज्योतीताई जाधव ( सरचिटणीस – नवी मुंबई जिल्हा महिला ) व जिवन वाडते गुरुजी (सरचिटणीस – नवी मुंबई जिल्हा ) यांनी केले. भोजनाची सुरेख व्यवस्था करण्यात आली. वर्धापन दिनाचे आयोजक जयवंत लव्हांडे गुरुजी ( जिल्हाध्यक्ष – नवी मुंबई जिल्हा) आणि इतर नवी मुंबई जिल्हा पुरुष कार्यकारिणी व शोभाताई कांबळे ( जिल्हाध्यक्ष – महिला कमिटी नवी मुंबई जिल्हा ) आणि इतर नवी मुंबई जिल्हा महिला कार्यकारिणी सर्वांचे मनापासुन हार्दिक अभिनंदन केले व आपल्या विशाल कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या

# शिवसेना नेते सी.के. मुरळीकर यांनी केला जिल्हा संचालक शेरखाने यांचा सत्कार

लातूर/ प्रतिनिधी, लातूर येथे राष्ट्रीय अपराध जांच ब्युरो, नवी दिल्ली.शाखा लातूरचे गुन्हे माहिती अधिकारी, खबर से हकीकत तक वृत्तपत्राचे संपादक आणि सेवानिवृत्त कलाशिक्षक शिरीष कुमार तुकाराम शेरखाने यांना महाराष्ट्र राज्याचे राज्य संचालक एडवोकेट चंद्रशेखर धोत्रे मुंबई हे राज्य दौऱ्यावर असताना स्वतः लातूरला येऊन त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल शिरीषकुमार शेरखाने यांची लातूर जिल्हा संचालक पदी नियुक्ती करण्यात आली.



त्या अनुषंगाने दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व शिवसेना पक्षाचे जिल्हा समन्वयक सी. के. मुरळीकर, विविध पदावर असलेले अनिल कबाडे व आदी कार्यकर्त्यांसह, त्यांच्या निवासस्थानी जाऊन *शिरीषकुमार शेरखाने*यांचा शान श्रीफळ बुके व स्वीट भरून हृदय सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांचे वडील सामाजिक कार्यकर्ते तुकाराम शेरखाने (पानगावकर) आणि त्यांचा संपूर्ण शेरखाने परिवार उपस्थित होता.

## किनवट तालुक्यातील बोथ येथे गॅस्ट्रोचे थैमान, एकाच दिवशी दोन बळी आदिवासी बहुल भागात, पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यास अद्यापही प्रशासन उदासीनच

किनवट/शेख शौकत : किनवट तालुक्यातील बोथ येथील गॅस्ट्रोमुळे एका महिलेसह पुरुषाचा मृत्यू झाला आहे. तर अनेकजण जुलाब उलटी या आजाराने ग्रस्त असून आरोग्य विभागाची टीम उपचार करीत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी बाजार केंद्रांतर्गत येत असलेल्या खंबाळा उपकेंद्रातील बोथ येथील दोन जलशुद्धीकरण केंद्र दुरुस्तीअभावी एक वर्षापासून धुळखात पडून आहेत. नाइलाजास्तव गावकऱ्यांना एका बोरवरील पाणी पिण्यासाठी वापरावे लागत आहे. भर पावसाळ्याच्या दिवसात दूषित पाणी पिण्याने कल्पना मारोती आत्राम (३७) यांना जुलाब व उलटी झाल्याने मांडवी येथील रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथे हलविण्यास सांगितले होते उपचारासाठी नेत असताना मध्यरात्री दोन वाजता आदिलाबादजवळ त्या महिलेचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सासू, सासरे व दीर आहे. तर बोथ येथे पाहुणे म्हणून आलेले परश्या तोडसाम (४७) यांनाही त्रास होत असल्याने उपचारासाठी किनवट येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचाही मृत्यू झाला आहे. तर लक्ष्मीबाई शामराव कंनलवार व गीता लक्ष्मण धुर्वे या दोन महिलांवर आदिलाबाद येथे उपचार सुरू आहे. सध्या बोथ गावात आरोग्य पथक दाखल झाले असून तालुका आरोग्य अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र उमरी (बाजार) वैद्यकीय अधिकारी यांच्यासह कर्मचारी नागरिकांची आरोग्य तपासणी करीत आहेत.

## सरकार' ; छत्रपतींचा पुतळा कोसळल्याचा सोलापुरात निषेध सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे कडाडल्या ! 'हे वरून शोबाज आतून पोकळ सरकार' ; छत्रपतींचा पुतळा कोसळल्याचा सोलापुरात निषेध

सोलापूर :- सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेचे पडसाद सोलापुरात ही उमटले. २८ ऑगस्ट रोजी बुधवारी जिल्हा परिषदेच्या पुनम गेट समोर काँग्रेस, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने एकत्रित येऊन कार्यकर्त्यांनी निषेध आंदोलन केले. या घटनेने आक्रमक झालेल्या महाविकास आघाडीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजीनामाची मागणी केली. पदाधिकारी यांनी आपल्या भाषणातून तीन पक्षाच्या सरकारवर टीका करत






मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने राजीनामा द्यावा अशी मागणी केली. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या आंदोलनाला उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोसळलेल्या पुतळ्याच्या विषयावरून हे सरकार वरून केवळ शोबाज आहे आणि आतून टोटली पोकळ असल्याचे टीका त्यांनी केली. त्यामुळे त्यांच्या आता कोणत्याही योजना चालणार नाहीत जनतेच्या लक्षात आलेले आहे हे सरकार आता महाराष्ट्रातून हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाही या शब्दात त्यांनी महायुतीच्या सरकारवर तोफ डागली. पहा काय म्हणाल्या प्रणिती शिंदे..

या

आंदोलनात काँग्रेसचे चेतन नरोटे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधीर खरटमल, शिवसेनेचे विष्णू कारमपुरी या तीन शहराध्यक्षांसह त्यांचे विविध पदाधिकारी माजी नगरसेवक विविध सेलचे अध्यक्ष कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## उदगीर तालुक्यात २ ते ४ सप्टेंबर दरम्यान ड्रोन वापरास बंदी

लातूर : - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुका हद्दीत २ सप्टेंबर, २०२४ रोजीचे ००.०१ पासून ४ सप्टेंबर, २०२४ रोजीचे २४.०० या कालावधीत ड्रोनचे विना परवाना व बेकायदेशीर ड्रोन प्रक्षेपण आणि ड्रोनचा (तात्पुरता रेड झोन) वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

# सम्यक कोकण कला संस्था आयोजित राज्यस्तरीय काव्य स्पर्धेचा निकाल जाहीर

### चंद्रकांत घाडगे यांनी प्रथम क्रमांक पटकावला

मुंबई :- कलावंतांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सम्यक कोकण कला संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय काव्य स्पर्धा संस्थेचे अध्यक्ष मंदार कवाडे यांच्या अध्यक्षतेखाली व बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या उपस्थितीत रविवार, दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ४:०० ते १०:०० या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी सरचिटणीस नरेश शिंदे आणि दुय्यम चिटणीस प्रविण मोहिते यांनी मांडलेल्या ठरावानुसार उपाध्यक्ष मुकुंद तांबे यांनी अत्यंत लाघवी शैलीत सूत्रसंचालन करून कार्यक्रमास रंग भरला तसेच उपाध्यक्ष विनोद धोत्रे यांनी प्रस्ताविक सादर केले. सदर कार्यक्रमाला बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष मा. लक्ष्मण भगत, समाजभूषण मा. भगवानदादा साळवी, मा. प्रकाशभाई जोशी, मा. मारुती सकपाळ (नाना), मा. रविंद्र तांबे, मा. संतोष गमरे, मा. मधुकर जाधव, प्रसिध्द गायिका मा. अष्टशिला बनसोडे, मा. सुभाष सावंत, मा. सुरज अटकोरे, मा. मोहन थोरात हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते, उपस्थित पाहुण्यांना शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले, सदर राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक नामवंत कवींनी सहभाग घेतला होता; जेष्ठ कवी व साहित्यिक इकबाल मुकादम, जेष्ठ कवी शांतीदूत शिर्के, प्रसिद्ध कवी दिपश्याम मंगळवेढेकर ह्यांनी परीक्षक म्हणून पारदर्शक भूमिका पार पाडली, यंदाच्या वर्षी संस्थेने दिलेल्या धर्म निरपेक्ष संविधान या विषयावर चंद्रमणी घाडगे, सुरेश पवार, मधुकर जाधव, विनोद जाधव, चंद्रकांत तांबे, चंद्रकांत घाडगे, वर्षाताई शिंदे, अरविंद पवार, प्रकाश तथा भाई जोशी, काजलताई गायकवाड, मारुती सकपाळ उर्फ अशोकानंद, रविंद्र तांबे, विश्वास कांबळे, गोपाळ पवार, अनिल जाधव, विजय पवार, आशिष राज जाधव, संदेश पवार, अनिल महेश गमरे व इतर कवींनी आपल्या कविता सादर केल्या, परीक्षकांनी निकाल जाहीर करताना सहभागी जेष्ठ, वरिष्ठ, कनिष्ठ कवींच्या कवितांचा विचार करून मोठ्या पराकाष्ठेने व पारदर्शक पध्दतीने निकाल जाहीर केला व निकालाअंती कवी चंद्रकांत घाडगे यांना प्रथम क्रमांक, कवी मारुती सकपाळ यांना द्वितीय क्रमांक, कवी गोपाळ पवार यांना तृतीय क्रमांक जाहीर करण्यात आले प्रथम तीन क्रमांकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन उर्फ भाई जोशी व कवी




विश्वास कांबळे ह्यांना उत्तेजनार्थ क्रमांक देऊन त्यांनाही सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सहभागी सर्वच कवींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनाही सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाचा समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष व आधारस्तंभ भगवानदादा साळवी आणि त्यांच्या पत्नी स्वाती भगवान साळवी यांना पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच गावी सरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल नरेश शिंदे आणि त्यांच्या पत्नी वर्षा नरेश शिंदे यांनाही पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदर प्रसंगी आपली मनोगते व्यक्त करीत असताना मान्यवरांनी सम्यक कोकण कला संस्था सांस्कृतिक, सामाजिक बांधिलकी जोपासत राबवत असलेल्या विविध उपक्रमांबद्दल त्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, तसेच विजेत्या व सहभागी सर्वच कवींचे कौतुक करीत त्यांना शुभेच्छा दिल्या, सर्वच कवींच्या कविता या एकापेक्षा एक होत्या तरीही सर्वच कवींच्या कवितांचा सर्वांगीण विचार करून परीक्षकांनी पारदर्शकपणे कलात्मक दृष्टीने कसोटीवर उतरवून निकाल जाहीर केल्याबद्दल त्यांचेही कौतुक करून त्यांचे आभार मानले. अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष मंदार कवाडे यांनी गेल्या २५ वर्षे संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांचा गोषवारा घेतला, कलावंतांच्या अडचणी आणि आर्थिक परिस्थितीची कल्पना त्यांनी मान्यवरांना दिली. अशाही परिस्थितीत संस्था आपली सामाजिक बांधिलकी जोपासत असल्याची आणि पुढेही जोपासत राहील अशी भावना ही त्यांनी व्यक्त केली, सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून अध्यक्ष मंदार कवाडे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी लातुरातील ३६ हजार महिलांचे अर्ज मंजूर

लातूर :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी दुसऱ्या टप्प्यात लातूर शहर विधानसभा मतदार संघातील एकूण ३६ हजार महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले असून लवकरच त्यांच्या खात्यावर रक्कम जमा होईल, अशी माहिती या योजनेच्या लातूर शहर विधानसभा मतदार संघाच्या अध्यक्षा प्रेरणा होनराव यांनी दिली.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची महत्वपूर्ण बैठक नुकतीच प्रेरणा होनराव यांच्या अध्यक्षतेखाली लातूर शहर मनपाच्या कार्यालयात मंगळवारी, दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी तथा सदस्य सचिव रोहिणी नऱ्हे - विरोळे, अशासकीय सदस्य नवनाथ आल्टे , सदाशिव गव्हाणे, सदस्य, तहसीलदार लातूर, मनपा उपायुक्त लातूर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, मनपाचे वडगावे , मनपा महिला व बालविकास अधिकारी प्रियंका तारू, बालविकास प्रकल्प अधिकारी भाग्यश्री क्षीरसागर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अध्यक्षा प्रेरणा होनराव यांनी मागच्या बैठकीत शहरातील ८५ हजार महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले होते, त्या व्यतिरिक्त काही त्रुटी आढळलेल्या अर्जाची छाननी करून ते मंजुरीसाठी पुन्हा समितीसमोर घेण्यात आले. त्यामध्ये ३६ हजार अर्जांना मंगळवारच्या बैठकीत मंजुरी देण्यात आल्याचे सांगितले. या महिलांच्या खात्यावर लवकरच या योजनेचे पैसे जमा होतील असे सांगून प्रेरणा होनराव म्हणाल्या की, या योजनेच्या माध्यमातून मागच्या वेळी मिळालेल्या पैशाने महिलांमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली आहे. आता मंजूर करण्यात आलेल्या सर्वच महिलांच्या खात्यावर तीन महिन्याचे एकूण साडेचार हजार रुपये प्रत्येकी जमा होणार आहेत. प्रशासनाने अवघ्या २० दिवसात ३६ हजार महिलांना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी घेतलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अध्यक्ष या नात्याने आपण उर्वरित महिला भगिनींनाही या योजनेचा लाभ मिळावा यासाठी गतिमान यंत्रणा कार्यान्वित करून या योजनेपासून एकही महिला भगिनी वंचित राहणार नाही, याची दक्षता बाळगण्याच्या सूचना दिल्याचे होनराव यांनी सांगितले.

## सोमवार २६ ऑगस्ट २०२४ महाराष्ट्रासाठी काळा दिवस. शिवरायांना मानणारा एक मराठा लाख मराठा कुठे आहे?.

### महाराज आम्हाला माफ करा...!

मुंबई / प्रतिनिधी :- महापुरुषांची विचार धारा फक्त नावापुरती सत्तेच्या लालसेसाठीच असुन सत्तापिपासुंनी ते खर करुन दाखविले आहे.मालवण मधील राजकोट किल्ल्यावरील आमचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडणे ही निंदनिय घटना आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नांवाचा व पुतळ्याचा सत्तेसाठी वापर करणे ही सत्तापिपासुंचे पितळ उघड करणारी घटना आहे. घाई गडबडीत निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन लोकांच्या भावनेशी खेळायच,लोकांचा विरोध असताना आकारहीन व शिल्पशास्त्रास अनुसरुन नसलेल्या पुतळ्याचे काही महिन्यांपुर्वीच पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण करुन जगभर प्रसिध्दी मिळवणाऱ्या राजकिय नेत्यांचे याबाबतीत काय मत असेल? काय भावना असेल? साडेतीनशे वर्ष गड किल्ल्यावर विचारांचे स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपतीचा पुतळा आठ महिन्यात पाडवा या सारखी लाजीरवाणी गोष्ट नाही,आता पुतळा बसवणारे उद्घाटन करणारे काही दिवसाने पुतळा पडल्याचा वेगळा इतिहास लिहतील.त्यांचा तीव्र निषेध करण्यासाठी शिवरायांना मानणारा एक मराठा लाख मराठा समाज रस्त्यावर उतरून सत्ताधाऱ्यांना घाम फोडणार असला पाहिजे होता.बाकीच्यावेळी जीवतोडून रस्त्यावर उतरणार शिवसैनिक,मनसे सैनिक,मराठा सैनिक तेवढ्या जिद्धीने रस्त्यावर उतरून निषेध करतांना दिसत नाही.आणि शिवरायच्या पुतल्यावर फोटोवर प्रेम करणारा शिवरायांना मानणारा एक मराठा लाख मराठा ही कुठे आहे?. शिवरायचे विचार पायदळी तुडवणारे,त्यांच्या प्रतिमेचे दैवतीकरण करणारे, निवडणूक डोळ्या समोर ठेऊन निषेध करीत आहेत. या सर्व घटना डोळ्यासमोर ठेऊन सत्यशोधक कामगार संघटनेच्या वतीने मी सागर रामभाऊ तायडे या घटनेचा जाहीर तीव्र निषेध करीत आहे.

## लातूर क्रेडाईच्या वतीने कामगार नोंदणी अभियान

लातूर : क्रेडाई लातूर व कामगार कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी पहिले बांधकाम कामगार नोंदणी अभियान राबविण्यात आले. या अभियानात एक हजारपेक्षा जास्त कामगारांनी नोंदणी केली. लातूर शहरात विविध पाच ठिकाणी अभियान राबवून सुमारे ७ हजारपेक्षा जास्त नवीन कामगार नोंदणी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे क्रेडाईचे अध्यक्ष जगदीश कुलकर्णी यांनी सांगितले. या वेळी क्रेडाईचे अध्यक्ष जगदीश कुलकर्णी, सचिव संतोष हत्ते, माजी अध्यक्ष सुबोध बेळंबे, भावी अध्यक्ष उदय पाटील, कोशाध्यक्ष आशीष कामदार, उपाध्यक्ष किरण मंत्री, महेश नावंदर, अमोल मुळे, सहसचिव श्रीकांत हिरेमठ व प्रोजेक्ट चेअरमन विष्णु मदने यांच्यासोबत क्रेडाईचे मेंबर्स धर्मवीर भारती, नागनाथ गित्ते, उदय पाटील, दीपक कोटलवार, श्रीकांत हिरेमठ, लेबर वेलफेअर कमिटीचे सुरज मंत्री, रितेश अवस्थी, अभिजित सरसंभेकर, नितीन मंडाले, वसीम शेख, भागवत बरूरे, गोविंद मदने, रमाकांत गित्ते यांच्यासह क्रेडाई लातूर टीम या वेळी उपस्थित होती. या वेळी उपस्थित कामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळाची विविध




कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. यासाठी दिशा फाऊंडेशनच्या सदस्यांचे खुप मोलाचे सहकार्य या कार्यक्रमाला मिळाले. लातूरसारख्या शहरात अशाप्रकारच्या कार्यक्रमाला बांधकाम कामगारांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. भविष्यातही जास्तीत जास्त नवीन कामगार नोंदणी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे जगदीश कुलकर्णी यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE